पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी

# अटी व शर्ती

<table>
<tr><td>१.</td><td>सदर शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट १ ते १२ " मधील भाडेदर हे एका सत्रासाठी आहेत.</td></tr>
<tr><td>२.</td><td>पु.ल .देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांचा तपशील परिशिष्ट-१ प्रमाणे राहील .</td></tr>
<tr><td>३.</td><td>आरक्षण सत्रांचा तपशील-:<br>१.नाट्यगृहे:-नाट्यगृहांसाठी एक सत्र साडेचार तासांचे असेल. त्यात कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आणि नंतरचा रंगमंच पूर्ववत उपलब्ध करुन देण्याचा कालावधी समाविष्ट आहे. त्यानुसार आरक्षणकर्त्यांनी आपापल्या प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळा घोषित कराव्यात. सत्रांचा तपशील पुढीलप्रमाणे-:
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सत्र</th><th>कालावधी</th></tr>
<tr><td>१</td><td>सकाळ</td><td>सकाळी ०९.३० ते दुपारी ०२.००</td></tr>
<tr><td>२</td><td>दुपार</td><td>दुपारी ०२.३० ते सायं. ०७.००</td></tr>
<tr><td>३</td><td>रात्र</td><td>रात्रौ ०७.३० ते १२.००</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

**२.प्रदर्शन दालने:-**

| प्रदर्शन दालन क्रमांक | सत्रकालावधी | वेळ |
|---|---|---|
| प्रदर्शन दालन क्र.१ व २ | ७ दिवसांचे एक सत्र | सकाळी ११ ते सायं.०७ |
| प्रदर्शन दालन क्र. ३,४,५ व ६ | १ दिवसाचे एक सत्र | सकाळी ११ ते सायं ०७ |

**३.दृक्-श्राव्य संकुल:**-आरक्षणकर्ता दृकश्राव्य संकुलातील स्टुडिओचे आरक्षण कमीतकमी एक तासासाठी व कामकाजाच्या स्वरूपानुसार आवश्यकता असेल तेवढ्या जास्तीतजास्त कालावधीसाठी आरक्षण करू शकेल. दृकश्राव्य संकुलातील स्टुडिओचे मुलभूत भाडेदर एक तासाकरिता निश्चित केले असल्याने आरक्षणकर्त्यांनी जितक्या कालावधीकरिता स्टुडीओ वापरला असेल त्यानुसार प्रति तास दरानुसार भाडे आकारणी करण्यात येईल.

त्यानुसार आरक्षणकर्त्यांनी आपापल्या प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार अकादमीत प्रत्यक्ष येऊन आरक्षण करणे आवश्यक असेल. सत्रांचा तपशील पुढीलप्रमाणे-:

| क्र | कक्ष (स्टुडीओ) | सत्र कालावधी | वेळ |
|---|---|---|---|
| १ | आभासी चित्रीकरण कक्ष (क्रोमा स्टुडीओ) | १ दिवस | सकाळी ०९.३०ते रात्रौ १२.०० |
| २ | ध्वनिमुद्रण व ध्वनिरोपण कक्ष (रेकॉर्डिंग व डबिंग स्टुडिओ) | १ दिवस | सकाळी ०९.३०ते रात्रौ १२.०० |
| ३ | व्हिडीओ संकलन कक्ष (व्हिडीओ एडिटिंग स्टुडिओ) | १ दिवस | सकाळी ०९.३०ते रात्रौ १२.०० |
| ४ | ग्राफिक्स व संगीत संयोजन कक्ष (व्हीएफएक्स स्टुडीओ) | १ दिवस | सकाळी ०९.३०ते रात्रौ १२.०० |

४ **नाट्यगृहांसाठी राखीव सत्र :-**

१. प्रत्येक शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी रवींद्र नाटय मंदिर व लघु नाट्यगृहातील दुपारचे सत्र खाली दर्शविल्यानुसार राखीव असतील-:

| नाट्यगृह | दुपारचे सत्र |
|---|---|
| रवींद्र नाट्यमंदिर | मराठी व्यावसायिक नाटक |
| लघु नाट्यगृह | मराठी कलाविष्कार |

२. मराठी बालनाट्य व संगीत नाटकांसाठी एका वर्षामध्ये रवींद्र नाट्य मंदिराची प्रत्येक शनिवार, रविवारव सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सकाळची २४ सत्रे व लघु नाट्यगृहाची (मिनी थिएटर) सकाळची १२ सत्रे, सवलतीच्या दरातील सत्रे म्हणून राखून ठेवण्यात येतील. प्रत्येक संस्थेला जास्तीत जास्त २ राखीव सत्रांचा लाभ घेता येईल.

| नाट्यगृह | सकाळचे सत्र |
|---|---|
| रवींद्र नाट्यमंदिर | एकूण २४ सत्रे |
| लघु नाट्यगृह | एकूण १२ सत्रे |

**टीप:-** मराठी बालनाट्य व संगीत नाटकांच्या उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या राखीव सत्रांसाठी भाडेदरात, मराठी व्यावसायिक नाटकासाठी असलेल्या भाडेदाराच्या २५ टक्के सवलत असेल.

| | |
|---|---|
| ५ | **कार्यक्रमाचे वर्गीकरण-:** |

| मराठी कलाविष्कार | अमराठी कलाविष्कार | अन्य कार्यक्रम |
|---|---|---|
| मराठी भाषेतील नाटक, बालनाट्य, प्रायोगिक नाटक, संगीत नाटक, काव्यवाचन, लोककला, चित्रपट, साहित्य विषयक कार्यक्रम, सुगम संगीत, शात्रीय संगीत, वाद्यसंगीत, एकपात्री प्रयोग इ. कार्यक्रम. | मराठी व्यतिरिक्त अन्य भाषेतील नाटक, बालनाट्य, प्रायोगिक नाटक, काव्यवाचन, लोककला, चित्रपट, साहित्य विषयक कार्यक्रम, वाद्यवृंद, एकपात्री प्रयोग इ. कार्यक्रम. | मराठी व अमराठी कलाविष्कारात समाविष्ट न होणारे कार्यक्रम. |

| | |
|---|---|
| ६ | **आरक्षणाबाबतची कार्यपद्धती :-** |

| अराखीव | राखीव |
|---|---|
| अराखीव सत्रांच्या बाबतीत, आरक्षणकर्त्यास सत्रांसाठी अकादमीच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ९० दिवस अगोदर पासून आरक्षण करता येईल. | राखीव सत्रांच्या बाबतीत, प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवसाच्या ६ दिवस अगोदर पर्यंत ऑनलाईन पद्धतीने आरक्षण न झाल्यास ती सत्रे अराखीव समजण्यात येऊन अन्य कार्यक्रमांच्या आरक्षणासाठी उपलब्ध होतील. |

| | |
|---|---|
| ७ | **शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी रवींद्र नाट्यमंदिर व लघु नाट्यगृहाची (मिनी थिएटर) आरक्षण कार्यपद्धती :-** |

| पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी | सर्व राज्य शासकीय विभाग व त्यांचे उपक्रम, केंद्र शासन व त्यांचे उपक्रम |
|---|---|
| पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला एका वर्षामध्ये रवींद्र नाट्य मंदिराची ३६ सत्रे, लघु नाट्यगृहाची (मिनी थिएटरची) ३६ सत्रे, प्रदर्शन दालने-१ ते ६ (आर्ट गॅलरी) यांची प्रत्येकी ६ सत्रे राखीव ठेवण्यात येतील. ही सत्रे अकादमीस विनामूल्य वापरता येतील.<br>तसेच ध्वनीमुद्रण, चित्रीकरण, संकलन इत्यादी कामाकरिता स्टुडिओचे अकादमीस १०० तास विनामूल्य वापरता येतील. त्याच प्रमाणे सांस्कृतिक कार्य विभाग व अधिनस्त असलेल्या विभागीय कार्यालयांना ५० तास राखीव ठेवण्यात येतील, हे तास सांस्कृतिक कार्य विभाग व अधिनस्त विभागीय कार्यालयांना विनामूल्य वापरता येतील. मात्र स्टुडिओमध्ये वापरण्यात येणाऱ्या उपकरणांसाठी शुल्क आकारण्यात येईल. | सर्व राज्य शासकीय विभाग व त्यांचे उपक्रम,केंद्र शासन व त्यांचे उपक्रम यांना अकादमीच्या संकुलातील रवींद्र नाट्य मंदिर व लघु नाट्यगृह (मिनी थिएटर) येथे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी एका वर्षामध्ये रवींद्र नाट्य मंदिराची २० सत्रे व लघु नाट्यगृह (मिनी थिएटर) ची १० सत्रे, विनामुल्य सत्रे म्हणून राखून ठेवण्यात येतील. या व्यतिरिक्त अधिक सत्रे पाहिजे असल्यास त्यासाठी नियमानुसार अनुज्ञेय भाडे व सुरक्षा अनामत रक्कम कला अकादमी मध्ये धनाकर्षाद्वारे जमा करणे आवश्यक राहील. राखीव सत्रांच्या कलावधीतील कार्यक्रमाच्या वेळेस नाट्यगृह इमारत, फर्निचर, फिटींग्स, वायरिंग, इतर साहित्याचे नुकसान झाल्यास, सदर नुकसान भरपाई पुढील कार्यक्रमासाठी आरक्षणापूर्वी अकादमी मध्ये भरणा करणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| ८. | **भाडे आकारणी व अतिरिक्त आकारणीबाबत नियम व अटी-:**<br>१. आरक्षणकर्त्यांनी ऑनलाईन भाडे रक्कम व अनामत रक्कम भरल्यानंतरच त्यांचे आरक्षण निश्चित होईल.<br><br>२. सर्व राज्य शासकीय विभाग व त्यांचे उपक्रम, केंद्र शासन व त्यांचे उपक्रम यांना आकरण्यात आलेले भाडे, त्यांना संबंधित आर्थिक वर्षात अदा करणे आवश्यक राहील. संबंधित आर्थिक वर्षात भाडे अदा न केल्यास, पुढील आर्थिक वर्षात थकीत भाडे अदा करेपर्यंत त्यांना पुढील कार्यक्रमांसाठी आरक्षण दिले जाणार नाही.<br><br>३. आरक्षणकर्त्यास १ पेक्षा जास्त दिवसांसाठी सलग आरक्षण करावयाचे झाल्यास, अशा प्रकरणी, ऑफलाईन पद्धतीने आरक्षणास मान्यता देण्याचे अधिकार संचालक पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना राहतील.<br><br>प्रत्येक शनिवार ,रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीचे दुपारचे सत्र मराठी व्यावसायिक नाटकासाठी राखीव ठेवण्यात आले असेल तरी, एखाद्या आरक्षणकर्त्याने शनिवार/रविवार/सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीची सलग दोन सत्रे वाद्यवृंद किंवा तत्सम कार्यक्रमासाठी आरक्षित केल्यास किंवा एखाद्या आरक्षणकर्त्याने/संस्थेने १ पेक्षा जास्त दिवसांसाठी सलग आरक्षण केल्यास व त्यामध्ये शनिवार/रविवार/सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास, त्या शनिवार/रविवार/सार्वजनिक सुट्टीचे दुपारचे सत्र मराठी व्यावसायिक नाटकासाठी आरक्षित केले गेलेले नसल्यास अशा आरक्षणकर्त्यांना/संस्थाना आरक्षण देता येईल.<br><br>४. अकादमीच्या संकुलातील रवींद्र नाट्य मंदिर, लघु नाट्यगृह, कला तसेच प्रदर्शन दालने, कलांगण, इ. तसेच अकादमीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या इतर सोयी सुविधा यांचे भाडे परिशिष्ट २ ते १२ मध्ये दिलेल्या दरांनुसार अकादमीमध्ये ऑनलाईन जमा करणे आवश्यक राहील. परिशिष्ट २ ते १२ मध्ये दिलेले दर हे मूलभूत दर आहेत. वेळोवेळी अनुज्ञेय होणारे कर, इतर शुल्क आदि स्वतंत्रपणे आकारण्यात येतील.<br><br>५. भाडे रक्कमेमध्ये रवींद्र नाट्य मंदिर येथे प्रति सत्र पंधरा किलोवॅट व लघु नाट्यगृह येथे दहा किलोवॅट इतक्या वीजेचा आकार समाविष्ट आहे. आरक्षणकर्त्यांनी, कार्यक्रमाच्या विहीत सत्राच्या वेळेत यापेक्षा जास्त वीजेचा वापर केल्यास, प्रति सत्र रुपये २०००/- इतके अतिरिक्त शुल्क आकारण्यात येईल व सदरची रक्कम सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल.<br><br>६. राखीव सत्रांचे आरक्षण करतांना आरक्षण कर्त्याने तो ज्या नाटकासाठी आरक्षण केले असेल. तेच नाटक सादर करणे अनिवार्य राहिल. त्यात बदल झाल्यास अनामत रक्कमेतून ५०% रक्कम जप्त करण्यात यावी.<br><br>७. आरक्षणकर्त्यांनी सलग दोन सत्रे आरक्षित केल्यास दोन सत्रांच्या वेळांमधील कालावधीकरिता वातानुकूलित यंत्रणेच्या वीज बिलापोटी रुपये ५००/- आकारण्यात येतील. सदरची रक्कम आरक्षणकर्त्यास ऑनलाईन सत्र आरक्षित करतानाच भरणा करावी लागेल. |

८. कार्यक्रमाच्या भाडेरक्कमेमध्ये रवींद्र नाट्य मंदिर येथे नाटकांकरिता ०३ फूट माईकस्, ०४ लेव्हल आणि ०४ मोढे (डायस्) व इतर कार्यक्रमांकरिता ४ जनरल लाईट्स, १० स्पॉट लाईट्स, ०५ हॅगिंग माईकस् व ०१ स्टँड माईक यांचा समावेश असेल. तर, लघु नाटकगृह (मिनी थिएटर) येथे नाटकांकरिता ०२ लेव्हल्स, ०२ मोढे (डायस्) इतर कार्यक्रमांकरिता ०२ जनरल लाईट्स, ०६ स्पॉट्स लाईट्स, ०२ हॅगिंग माईकस् व ०१ स्टँड माईक यांचा समावेश असेल. या व्यतिरिक्त आरक्षणकर्त्यांनी कार्यक्रमादरम्यान अकादमीच्या अतिरिक्त सेवा किंवा सुविधा वापरल्यास यासाठी भाडे आकारणी त्या-त्या वेळेस संचालक पु.ल.देशपांडे यांचेमार्फत निश्चित केल्यानुसार करण्यात येईल.

९. कार्यक्रमाच्या भाडेरक्कमेमध्ये नाट्यगृहामध्ये १० स्पॉट्स लाईट्स मोफत देण्यात आल्या आहेत. सदर १० स्पॉट्स लाईट्स व्यतिरिक्त नाटयगृहातून घेतलेल्या प्रत्येक स्पॉटलाईटससाठी प्रत्येक भाडे आकारणीमध्ये (१००० वँट करिता) रु.२००/- आकारण्यात येतील. प्रत्येक स्पॉट्स लाईट्सच्या अतिरिक्त वापराकरीता वीज बिलापोटी रु.७५/- याप्रमाणे आकारणी करण्यात येईल.

१०. स्वरगंधर्व सुधीर फडके दृक्-श्राव्य संकुलातील आभासी चित्रीकरण कक्ष (क्रोमा स्टुडिओ), ध्वनिमुद्रण व ध्वनिरोपण कक्ष (रेकॉर्डिंग व डबिंग स्टुडिओ), संकलन कक्ष, ग्राफिक्स व संगीत संयोजन कक्ष यामध्ये पुरविण्यात आलेल्या सोयी-सुविधांचा तपशील व भाडेदर याबाबतचे विवरण परिशिष्ट-११ मध्ये देण्यात आले आहे.

११. आभासी चित्रीकरण कक्ष (क्रोमा स्टुडीओ) च्या भाडेदरामध्ये, क्रोमा फ्लोर, चित्रीकरण नियंत्रण कक्ष, ३० सॉफ्ट पॅनेल, १० फ्रेसनेल लाईट्स सेटअप यांचा समावेश असेल. या व्यतिरिक्त आरक्षणकर्त्यांनी कार्यक्रमादरम्यान अकादमीच्या दृक्-श्राव्य संकुलातील अतिरिक्त सेवा किंवा सुविधा वापरल्यास यासाठी भाडे आकारणी त्या-त्या वेळेस संचालक पु.ल.देशपांडे यांचेमार्फत निश्चित केल्यानुसार करण्यात येईल.

१२. दृक्-श्राव्य संकुलातील आभासी चित्रीकरण कक्ष (क्रोमा स्टुडिओ), ध्वनिमुद्रण व ध्वनिरोपण कक्ष (रेकॉर्डिंग व डबिंग स्टुडिओ), संकलन कक्ष, ग्राफिक्स व संगीत संयोजन कक्ष यासाठी आकारण्यात येणाऱ्या भाडेदरामध्ये वीज, वातानुकूलित सेवा यांच्या वापरावरील आकार समाविष्ट नाही. वीज, वातानुकूलित सेवा यांच्या वापरासाठी प्रति तास रु.२५०/- प्रमाणे शुल्क स्वतंत्रपणे आकारण्यात येईल.

१३. दृक्-श्राव्य संकुलातील आभासी चित्रीकरण कक्ष (क्रोमा स्टुडिओ), ध्वनिमुद्रण व ध्वनिरोपण कक्ष (रेकॉर्डिंग व डबिंग स्टुडिओ),संकलन कक्ष, ग्राफिक्स व संगीत संयोजन कक्ष यासाठी ८ तासापेक्षा जास्त तासांसाठी आरक्षण केल्यास भाडेदरात पुढीलप्रमाणे सवलत देण्यात येईल.

| क्र. | आरक्षण कालावधी | सवलत |
|---|---|---|
| १ | ८ तासापेक्षा जास्त - १० तासापर्यंत | ५% |
| २ | १० तासापेक्षा जास्त - १२ तासापर्यंत | १०% |
| ३ | १२ तास व त्यापेक्षा अधिक तासांकरिता | १५% |

१४. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण अथवा कोणत्याही प्रकारचे चित्रीकरण करण्यासाठी आयोजकांना त्यांचा कॅमरा/मोबाईल/तत्सम उपकरणांचा वापर करावयाचा असल्यास त्यासाठी प्रतिसत्र प्रति कैमेरा/मोबाईल/तत्सम उपकरणासाठी रु.१०००/- अधिक वस्तू व सेवा कर यानुसार आकारणी करण्यात येईल. तसेच तिपाई (ट्रायपॉड) विना छायाचित्र काढण्यासाठी प्रतिसत्र १ कॅमेरा विना शुल्क वापरण्याची मुभा दिली जाईल.

१५. प्रदर्शन दालन क्र.-१ ते ६, सभागृहे/दालने, क्रोमा स्टुडीओ ,कलांगण इ. व त्यामध्ये पुरविण्यात आलेल्या सुविधा यांचे भाडे दर परिशिष्ट क्र.०४ ते १२ येथे नमूद केल्यानुसार राहतील.

१६. प्रदर्शन दालन क्र.१ व २ करिता आरक्षण भाडे व्यतिरिक्त विद्युत वापराकरिता प्रत्येक ७ दिवसांच्या सत्राकरिता प्रति दालन रु.२०००/- आकारण्यात येतील. त्याचप्रमाणे प्रदर्शन दालन क्र.३ ते ६ करिता आरक्षण भाडे व्यतिरिक्त विद्युत वापराकरिता प्रत्येक १ दिवसांच्या सत्राकरिता प्रति दालन रु.१५०/- आकारण्यात येतील.

१७. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीमध्ये उपलब्ध असलेल्या वाद्यांची यादी परिशिष्ट १२ मध्ये नमूद करण्यात आली आहे .सदर परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या वाद्यांचा भाडेदर प्रति वाद्य रु.१०० ) -/प्रति १ तासा करिता (अधिक वस्तू व सेवा कर इतका आहे .सदर दरात विद्यार्थांना पन्नास टक्के सवलत राहील .त्याकरिता त्यांना स्वतःचे ओळखपत्र सादर करावे लागेल.

१८. आरक्षणकर्त्यांनी कार्यक्रमादरम्यान अकादमीतील वाद्ये वापरल्यास परिशिष्ट-१२ प्रमाणे भाडे आकारणी करण्यात येईल.

१९. प्रदर्शन दालन क्र.१ व २ करिता आकारण्यात येणाऱ्या भाडेदरामध्ये, मूर्ती/शिल्प ठेवण्याकरिता पेडेस्टल (कमाल २०) चित्र /छायाचित्र टांगण्यासाठीचे हुक यांचा समावेश असेल. त्याचप्रमाणे प्रदर्शन दालन क्र.३ ते ६ करिता आकारण्यात येणाऱ्या भाडेदरामध्ये, टेबल (कमाल ५) व खुर्च्या (कमाल ५०) यांचा समावेश असेल.

२०. शासनाने जाहीर केलेली नैसर्गिक आपत्ती तसेच बंदी किंवा अकादमीतील तांत्रिक कारणांमुळे कार्यक्रम होऊ न शकल्यास सदर संस्थेला दुसरी पर्यायी तारीख परस्पर संमतीने त्याच आर्थिक वर्षात उपलब्ध करून देण्यात येईल. सदरहू तारखेला कार्यक्रम आयोजित करणे संबंधित संस्थेस शक्य झाले नाही तर भाडयापोटी जमा केलेल्या रकमेच्या ५० टक्के रक्कम रक्कम आरक्षणकर्त्यास परत करण्यात येईल. सुरक्षा अनामत रक्कम मात्र पूर्णपणे आरक्षणकर्त्यास परत करण्यात येईल.

२१. अकादमीच्या संकुलातील रवींद्र नाट्य मंदिर, लघु नाट्यगृह (मिनी थिएटर) कलादालने येथे होणाऱ्या कार्यक्रमांची (नाटक, चित्रपट, प्रदर्शने इ.) ८ x ८ चौ. फुटाची जाहिरात संस्थेने उपलब्ध करून दिल्यास अकादमीच्या प्रांगणातील स्क्रीनवर कार्यक्रमाच्या २ दिवस आधी, दिवसातून ४ वेळा ६० सेकंद विनामूल्य प्रसिध्द करण्यात येईल.

| ९ | रवींद्र नाट्य मंदिर व लघु नाट्यगृहाची (मिनी थिएटर) येथे सवलतीच्या दरात भाडे आकारणी:- |
|---|---|

| अ.क्र. | प्रकार | सवलत | सत्रे |
|---|---|---|---|
| १ | मराठी प्रायोगिक नाटक | मराठी व्यावसायिक नाटकासाठी असलेल्या दराच्या ५० टक्के सवलत | उपलब्धतेनुसार सर्व सत्रांसाठी |
| २ | मराठी बालनाट्य व संगीतनाटक | मराठी व्यावसायिक नाटकासाठी असलेल्या दराच्या २५ टक्के सवलत | अ.क्र.४(२)मध्ये नमूद केल्यानुसार |
| ४ | देशातील नामांकित संस्थांकडून लोप पावत चाललेल्या कलाविष्कारांचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांसाठी, राज्यातील उदयोन्मुख कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टीने आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी, समाजातील दिव्यांग, कॅन्सर रुग्ण व अन्य गंभीर आजारांचे रुग्ण यांनी अथवा त्यांच्यासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यता प्राप्त संस्थांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी एका संस्थेला ३ वर्षातून एकदाच ५०% सवलतीच्या दरातील सत्र उपलब्ध करून देण्यात येईल .त्यामुळे जास्तीत जास्त विविध संस्थाना /कलाकारांना शासनामार्फत सहाय्य करता येऊ शकेल. | सत्रासाठी असलेल्या भाड्याच्या दरात ५० टक्के सवलत | एका आर्थिक वर्षात रवींद्र नाट्य मंदिरची कमाल १२ सत्रे व लघु नाट्यगृहाची (मिनी थिएटर) कमाल १२ सत्रे देण्यात येतील. |

१० **अतिरिक्त भाडे व दंड आकारणी:-**

१. आरक्षणकर्त्याला त्याने आरक्षित केलेल्या सत्राची विहित वेळ पाळणे बंधनकारक आहे. आरक्षणकर्त्याने आरक्षित केलेल्या सत्राच्या विहित वेळे पेक्षा जादा वापर केल्यास, दर अर्धा तासाकरिता, एका सत्राच्या भाडेरक्कमेच्या ५० टक्के इतकी दंडाची रक्कम अनामत रकमेमधून वसूल करण्यात येईल व उर्वरित रक्कम कार्यक्रमानंतर सात दिवसाच्या आत आरक्षणकर्त्याच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्यात येईल.

२. एखादा कार्यक्रम हा मराठी कलाविष्कार किंवा अमराठी कलाविष्कार किंवा अन्य कार्यक्रम किवा बालनाट्य, संगीत नाटक यापैकी कोणत्या वर्गीकरणात येतो, याबाबत वाद निर्माण झाल्यास, सदर कार्यकम कोणत्या वर्गीकरणात येतो, हे ठरविण्याचा अधिकार संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना राहील. त्याकरिता कार्यक्रम सादर होण्यापूर्वी सदर कार्यक्रमाचे स्वरुप समजावून घेतले जाईल. नाट्यगृह/दालन आरक्षित

| | |
|---|---|
| | करतांना अर्जात नमूद केलेल्या कार्यक्रमापेक्षा प्रत्यक्षात सादर झालेला कार्यक्रम वेगळ्या स्वरुपाचा असल्याचे आढळून आल्यास भाडे रक्कमे इतकीच रक्कम दंडनीय स्वरुपात अनामत रकमेतून वसूल केली जाईल. |
| ११ | **सुरक्षा अनामत रक्कम:-**<br>१. आरक्षणकर्त्याकडून भाडेदराच्या रकमेएवढी सुरक्षा अनामत रक्कम ऑनलाईन जमा करणे आवश्यक राहील. कार्यक्रमानंतर सभागृहाची व परिसराची तपासणी करुन अकादमीचे कोणतेही नुकसान झाले नसल्याची खात्री करुन व प्रशासकीय बाबीच्या पूर्ततेनंतर सुरक्षा अनामत रक्कम कार्यक्रमानंतर सात दिवसाच्या आत आरक्षणकर्त्याच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्यात येईल.<br>२. मात्र, आरक्षण कर्त्यांकडून कार्यक्रमाच्या वेळेस नाट्यगृह इमारत, फर्निचर, फिटींग्स, वायरिंग, इतर साहित्याचे नुकसान झाल्यास त्यांच्या अनामत रकमेतून नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल व उर्वरित रक्कम कार्यक्रमानंतर सात दिवसाच्या आत आरक्षणकर्त्याच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्यात येईल. परंतु नुकसान भरपाई रक्कम अनामत रकमेपेक्षा जादा असल्यास, सदरहू जादा रक्कम संस्थेस ऑनलाईन भरणा करावी लागेल. अन्यथा पुढील कार्यक्रमांसाठी आरक्षण देण्यात येणार नाही.<br>३. आरक्षणकर्त्यांना, त्यांनी आरक्षित केलेल्या जागेव्यतिरिक्त अकादमी परिसरातील अन्य इतर कोणत्याही जागेचा कोणत्याही कारणास्तव वापर करता येणार नाही. तसे केल्यास, सदर अतिरिक्त वापराबाबत देय असणारी रक्कम त्यांच्या अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल व उर्वरित रक्कम कार्यक्रमानंतर सात दिवसाच्या आत आरक्षणकर्त्याच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्यात येईल.<br>४. मराठी व्यवसायिक नाटक संस्था /निर्मिती संस्था यांना सबंधित आर्थिक वर्षात प्रथम आरक्षण करताना, भाडेदराइतकी सुरक्षा अनामत रक्कम ऑनलाईन जमा करणे आवश्यक राहील. सदर अनामत रक्कमेतून त्या त्या नाट्यप्रयोगादरम्यान, नाट्यगृह इमारत, फर्निचर, फिटींग्स, वायरिंग, इतर साहित्य इत्यादिचे नुकसान झाल्यास, सदर नुकसान भरपाई त्यांच्या अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल. तसेच अशाप्रकारच्या वसुलीमुळे अनामत रक्कम संपुष्टात आल्यास ती पुन्हा पूर्वीप्रमाणे ऑनलाईन जमा करणे आवश्यक राहिल. अन्यथा त्यांना पुढील कार्यक्रमांसाठी आरक्षण दिले जाणार नाही.त्या आर्थिक वर्षाअखेर, अनामत रक्कम पूर्णपणे/उर्वरित रक्कम आरक्षणकर्त्याच्या बँक खात्यात परस्पर जमा परत करण्यात येईल. |
| १२ | **आरक्षण रद्द करण्याबाबत:-**<br>१. अराखीव सत्रांच्या बाबतीत, सादरीकरणाच्या तारखेपूर्वी १५ दिवस अगोदर ऑनलाईन आरक्षण रद्द केल्यास भाडे रक्कमेतून ५% कपात करून उर्वरित रक्कम आरक्षणकर्त्याच्या बँक खात्यात परस्पर जमा / परत करण्यात येईल. त्यानंतर आरक्षण रद्द केल्यास भाडे रक्कम परत करण्यात येणार नाही.<br>२. राखीव सत्रांसाठी कार्यक्रम सादरीकरणापूर्वी १५ दिवस अगोदर आरक्षण रद्द केल्यास भाडे रक्कमेतून १०% कपात करून उर्वरित रक्कम आरक्षणकर्त्याच्या बँक खात्यात परस्पर जमा / परत करण्यात येईल. त्यानंतर आरक्षण रद्द केल्यास भाडे रक्कम परत करण्यात येणार नाही. |

| | |
|---|---|
| १३ | व्यावसायिक कलाकारांकडून/संस्थांकडून चालविले जाणारे अभ्यासक्रम /उपक्रम/शिबिरे /प्रदर्शने यांच्याबाबत कार्यपद्धती व आकारणी :- |

| अ.क्र | तपशील | आकारणी |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक कलाकारांकडून / संस्थांकडून योग, गायन, वादन, नृत्य, अभिनय इत्यादीचे चालविले जाणारे अभ्यासक्रम / उपक्रम / शिबिरे इ.साठी दालन हवे असल्यास, आरक्षणकर्त्यास भाडेदरात १०० टक्के सूट देण्यात येईल. परंतु आरक्षणकर्ता जे दालन आरक्षित करेल ,त्यासाठी असणाऱ्या भाडे रक्कमेइतकी अनामत रक्कम त्याला अकादमीत जमा करणे आवश्यक असेल.<br>तथापी आरक्षणकर्त्याला तो अकादमीच्या दालनात घेत असलेल्या अभ्यासक्रम / उपक्रम / शिबिरे इ. साठी विद्यार्थ्यांकडून तो आकारात असलेल्या शुल्काच्या उत्पन्नातील ३० टक्के रक्कम त्याने अकादमीस देणे बंधनकारक राहील. | आरक्षणकर्त्याला तो अकादमीच्या दालनात घेत असलेल्या अभ्यासक्रम / उपक्रम / शिबिरे इ. साठी विद्यार्थ्यांकडून तो आकारत असलेल्या शुल्काच्या उत्पन्नातील ३० टक्के रक्कम किंवा किमान सदर दालनाचे जी भाडे रक्कम असले त्यापैंकी जी रक्कम अधीक असेल ती अकादमीकडून भाडे म्हणून आकारण्यात येईल.<br>याकरिता सदरहू वर्गात प्रवेश घेणाऱ्यांचा तपशील व विवरणपत्र अकादमीस वर्ग सुरु करण्यापूर्वी एक दिवस आधी सादर करावे लागेल. तसेच ज्या हेतूसाठी दालन आरक्षित केले आहे, त्या हेतूव्यतिरिक्त दालनाचा वापर होत असल्याचे आढळून आल्यास आरक्षणकर्त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्याचा उपक्रम त्वरित बंद करण्यात येईल. |
| २ | नामवंत कलाकारांच्या चित्र/शिल्प / छायाचित्र यांच्या कलाकृतींचे पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीने आयोजित केलेले प्रदर्शन | प्रदर्शनादरम्यान कलाकारांच्या चित्रे/शिल्पे/छायाचित्र यांची विक्री झाल्यास संबंधित कलाकाराला विक्रीच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातील ३० टक्के रक्कम अकादमीस देणे बंधनकारक राहील. |
| ३ | प्रदर्शन दालनात व्यावसायिक कलाकारांकडून /संस्थांकडून भरविले जाणारे प्रदर्शन | एखाद्या व्यावसायिक कालाकाराने/ संस्थेने प्रदर्शन दालन आरक्षितकरून चित्र/शिल्प/छायाचित्र यांचे प्रदर्शन भरविल्यास, प्रदर्शनादरम्यान त्याच्या कलाकृतींची विक्री झाल्यास त्या कलाकाराला विक्रीच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातील १० टक्के रक्कम अकादमीस देणे बंधनकारक राहील. |

१४ **सर्वसाधारण अटी:-**

१. आसन व्यवस्थेपेक्षा जास्त प्रेक्षकांना प्रेक्षागृहात प्रवेश दिला जाणार नाही.

२. प्रत्येक सत्रासाठी, रवींद्र नाटय मंदिर नाट्यगृहाच्या आसन व्यवस्थेतील “ए” रांगेतील

आसन क्र.७ ते १२ व "डी" रांगेतील आसन क्र.७ ते १६ अशी एकूण १६ आसने अकादमीसाठी राखीव राहतील. तर लघु नाट्यगृहाच्या बाबतीत "ए" रांगेतील आसन क्र.८ ते ११ अशी एकूण ४ आसने अकादमीसाठी राखीव राहतील.

३. सांस्कृतिक कार्यक्रमांव्यतिरिक्त कोणत्याही धार्मिक आणि राजकीय स्वरुपाच्या कार्यक्रमासाठीच्या आरक्षणचा निर्णय शासनमान्यतेने घेण्यात येईल.

४. अपवादात्मक परिस्थितीत आरक्षणकर्त्याच्या विनंतीनुसार व पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या उपलब्धतेनुसार एखाद्या दिवशी सत्राच्या वेळेत बदल करण्यात आल्यास सत्राचा कालावधी साडेचार तासांचाच राहील.

५. आरक्षणकर्त्यांनी आरक्षित केलेल्या सत्राच्या आधीच्या सत्रासाठी नाट्यगृह रिकामे असले तरी, आरक्षणकर्त्यांनी आरक्षित केलेल्या सत्राच्या वेळेतच नाट्यगृह उपलब्ध करुन दिले जाईल. मात्र, रिकामे असलेले सत्र सशुल्क उपलब्ध करून देण्याची आरक्षणकर्त्याने मागणी केल्यास ते त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी देय असलेले अधिकचे भाडे आरक्षणकर्त्यास भरावे लागेल.

६. एखाद्या व्यक्तीने/संस्थेने त्यांच्या साहित्य विषयक ,पुस्तक प्रकाशन इ.कार्यक्रमादरम्यान पुस्तकांचे स्टॉल रवींद्र नाट्यमंदिर/ लघु नाट्यगृहाच्या अकादमीने निश्चित केलेल्या जागेत लावल्यास प्रत्येक स्टॉलसाठी रु.५०० -/ अधिक सेवा कर आकारण्यात येईल.

७. रवींद्र नाट्यमंदिरामध्ये कार्यक्रमाच्या पूर्व तयारीसाठी अगोदरचे सत्र आरक्षित केल्यास त्यासाठी रु.५०००/- प्रति सत्र अथवा जो कार्यक्रम आहे, त्यासाठीच्या शुल्काच्या ५०% रक्कम यापैकी जी रक्कम अधिक असेल ती आकारण्यात येईल.

८. रवींद्र नाट्य मंदिराच्या पहिल्या मजल्यावरील पॅसेज एरियासाठी रु.५०००/- अधिक वस्तू व सेवा कर याप्रमाणे भाडे आकरण्यात करण्यात येईल. तसेच तिसऱ्या मजल्यावरील लघु नाट्य गृहाच्या जवळील मोकळी जागा आयोजकांनी जेवण/नाश्ता करण्यासाठी वापरल्यास त्यासाठी स्वतंत्र रु.२००० -/आकारण्यात येतील.

९. रवींद्र नाट्यमंदिर व लघु नाट्यगृह येथे रंगीत तालमासाठी संपूर्ण सत्राप्रमाणे भाडे आकारणी करण्यात येईल.

१०. ओ.बी.व्हॅन, जनरेटर व्हॅन, वॅनिटी व्हॅन इ.च्या पार्किंगकरिता अकादमीच्या संकुलात जागा उपलब्ध असलयासच आरक्षणकर्त्याला पार्किंग करण्याची परवानगी देण्यात येईल . त्याकरिता२४तासापर्यंतच्या कालावधीकरिता रु.१००० -/इतके शुल्क आकारण्यात येईल.

११. कलांगण परिसरात व्यावसायिक फोटो शूट करण्यासाठी प्रती तास रु.१००० -/इतके शुल्क आकारण्यात येईल.